ऑपरेशन दगड!
दोन अंकी स्वतंत्र नाटक :
लेखक - प्रल्हाद जाधव

DISCLAIMER : हे नाटक पूर्णपणे काल्पनिक असून त्यातील घटना-प्रसंगांचे, व्यक्ती-वर्णनांचे वा अन्य काही संदर्भांचे प्रत्यक्ष जीवनात कोठे साधर्म्य आढळून आल्यास तो केवळ एक योगायोग समजावा.

या नाटकात तीसच्या आसपास पात्रे दिसतात. पण त्यातील काही भूमिका आलटून-पालटून करता येण्यासारख्या आहेत. कलाकारांची संख्या कमी (किंवा अधिक) करूनही एखादा दिग्दर्शक हे नाटक उत्तमपणे सादर करू शकतो. मात्र असा निर्णय घेण्यापूर्वी नाटककाराशी चर्चा करून नाटकाच्या मूळ गाभ्याला काही धक्का लागणार नाही याची त्याने खात्री करून घेणे आवश्यक आहे.

ज्या पात्रांना स्वतःचे संवाद आहेत त्यांना विशेषनामे योजिली आहेत पण जे संवाद केवळ प्रतिक्रियात्मक स्वरूपाचे आहेत ते एक, दोन, तीन, चार असे क्रमांक देऊन नमूद केले आहेत. दिग्दर्शकाने असे संवाद कलाकारांना विचारपूर्वक वाटून द्यावेत. या अनुषंगाने साऱ्यांनी एकत्रित चर्चा करून निर्णय घेतल्यास नाटक समजून घेण्यासाठी तसेच ते निर्दोषपणे सादर करणासाठी मदत होईल.

१९९० साली म्हणजे ३४ वर्षांपूर्वी मी ‘ऑपरेशन दगड’ नावाची एक एकांकिका लिहिली होती. (डी.आर.एम. क्र. ११३/३०.१.९०) त्या एकांकिकेचे हे नाट्यरूप! हे नाटक लिहिण्यामागची भूमिका आणि ते कसे सादर होऊ शकते याविषयी सूचना/अपेक्षा व्यक्त करणारी माझी टिप्पणी या संहितेच्या शेवटी दिलेली आहे. संबंधितांनी तिचे जरूर अवलोकन करावे.

***

या नाटकातील पात्रे :

१. सूत्रधार (३०)
२. दगडू (४०)
३. मुक्या (३०)
४. नामदेव (२५. डोंगरवाडीचा रहिवासी. खाली शहरात जाऊन शिकता शिकता पार्ट टाईम नोकरीही करतो. आई-बापाशिवाय वाढलेला मुलगा. म्हातारी आजी आणि तो एकमेकाला धरून राहतात.)
५.बाज्या (४०. ह्याला तमाशाचा नाद. पंचक्रोशीत कुठे तमाशा असला की हा तिथे आवर्जून हजेरी लावणार!)
६.गणप्या (३०. सतत पिऊन असतो. गुपचूप घरातच भट्टी लावतो. गावात त्याची काही बांधलेली गिऱ्हाईके आहेत.)
७. अब्दुल (४०. कोंबड्या-बकऱ्या कापण्याचा व्यवसाय.)
८. हणम्या (३५)
९.चोख्या (३०)
१०. दौलतराव पाटील (५५. सरपंच. यांना काम न करता मोठेपणा मिरवण्यात अधिक रस!)
११. व्यंक्या चावरे (५०. हा पाटलांचा पाठीराखा. त्यांचा सल्लागार. चमचा म्हटले तरी चालेल!)
१२. पांडू गुरव (४५. ग्रामदैवताची पूजाअर्चा करणारा, गावचे सण-समारंभ सांभाळणारा, अंगारे धुपारे देणारा, देवाला कौल लावणारा, गाऱ्हाणे घालणारा भगत.)
१३. सखूबाई (४०. तरूण विधवा. तिला चंद्या आणि पमी ही दोन शाळकरी मुले. तिचा सैन्यातील नवरा काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यात कामी आला आहे. त्याच्या पेन्शनवर तिचे घर चालते.)
१४. चंद्या (१०)

१५. पमी (८)
१६. मंजुळा (३५. उपक्रमशील गृहिणी. तिचा नवरा गुरे सांभाळतो, भाजीपाला पिकवतो. ती खालच्या गावात जाऊन भाजीपाला, दूध इत्यादिची विक्री करते.)
१७. सुशीला (३०. डोंगरवाडीच्या खाली असणाऱ्या आंबेवाडीत, जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका.)
१८. म्हातारी (७५. कमरेत वाकलेली नामदेवची आजी. काठी टेकत, लटलटत चालते. नऊवार साडी, डोक्यावर पदर, नथ, गळ्यात जुने गाठले. प्रेमळ पण खमकी!)
१९. हवालदार नागेश राठोड (३५)
२०. इन्स्पेक्टर बाजीराव घोरपडे (४०)
२१. कलेक्टर एस.रामपाल (४०)
२२. तहसीलदार सुरूपसिंग पोळ (४५)
२३. पालकमंत्री अण्णासाहेब देशमुख (६०)
२४. चिफ इंजिनियर पी.के. नायडू (५०)
२५. डेप्युटी इंजिनियर विकास कोळेकर (३०)
२६. रेस्क्यू टीम (२५ ते ३० वर्षे वयातील चार-पाचजण)

***

(पडदा उघडतो. धुपाचा सुगंध. हार्मोनियमचे सूर. सर्व कलाकार रंगमंचावर हात जोडून ओळीत उभे. नांदीवजा महाराष्ट्र-गीत म्हणत आहेत. सूत्रधार नेतृत्व करत आहे.)

'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा…
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ऽऽऽ'

( 'दगडांच्या देशा' या शब्दांवर अडकल्यागत सारे ते शब्द पुन:पुन्हा म्हणत राहतात.)

सूत्रधार : (त्यांना थांबवत) अरे हो हो, थांबा थांबा, काय चाललंय  हे 'दगडांच्या देशा,दगडांच्या देशा?'

एक : 'दगडांच्या देशा'वर गाडी अडकली आहे, एखादा धक्का मारल्याशिवाय पुढं जाणार नाही ती!

सूत्रधार : तेच म्हणतोय मी! गोविंदाग्रज ऊर्फ राम गणेश गडकरी यांना या गीतातून नेमकं काय सांगायचंय ते आधी समजून तर घ्या नीट!

दोन : (पुढे येत) त्यात काय समजून घ्यायचं? दगडांच्या देशा म्हणजे 'दगडांच्या देशा!' हा देश दगडांचा नाही का?

सूत्रधार : म्हणजे आपण सगळे दगड आहोत असंच ना?

दगडू : (डोक्यावर घोंगडीची खोळ. साधा लेंगा-बनियन. हातात गुराख्यांकडे असते तशी काठी. पात्रांच्या रांगेतून पुढे येत) आक्षी बराबर हाय बघा तुमचं!

सूत्रधार : खरंच वाटतंय का तुलापण असं?

दगडू : वाटतंय म्हजी काय?अगदी हंड्रेड परशेंट!

सूत्रधार : नाव काय तुझं?

दगडू : माजं नाव हाय बगा, दगडू!

सूत्रधार : बापाचं नाव?

दगडू : बाचं नाव हाय बगा, धोंडू!

सूत्रधार : मग आडनाव 'फत्तरे' असणार?

दगडू : (मान डोलवत) आक्षी बराबर! (सगळे हसतात)

सूत्रधार : वाटलंच होतं मला. हे असलं विचित्र नाव कसं काय रे बाबा तुझं?

दगडू : त्येचं आसं झालं सरकार, आमच्या आज्याच्या घरात एकबी प्वार जगत नव्हतं. तवा आमच्या आज्जीनं गावात पूजा सांगणाऱ्या गुरुजींचा सल्ला घेतला आणि द्येवाला नवस केला. म्हनाली, "द्येवा माजं प्वार जगू दे, त्येचं नाव म्या धोंडू ठिवीन."

सूत्रधार : आणि मग तुझ्या बापाचा जन्म झाला, बरोबर?

दगडू : आक्षी बराबर!

सूत्रधार : आणि मग तुझं दगडू हे नाव कसं काय आलं?
दगडू : त्येचं बी आसंच झालं बगा. माज्या बाला आठ-धा पोरं झाली. पर त्यातलं एकबी जगलं न्हाय. म्हनून बानं गुरुजींचा सल्ला घेतला आन् द्येवाला नवस केला. म्हणाला, “द्येवा, माजं प्वार जगू दे, म्या त्येचं नाव दगडू ठिवीन.”
सूत्रधार : आणि मग तू जन्माला आलास, बरोबर?
दगडू : आक्षी बराबर!
सूत्रधार : तुला काही पोरबाळ?
दगडू : योक पोर हाय पर ते जन्माला येयाच्या आधीच-
सगळे : म्या गुरुजींचा सल्ला घेतला आणि देवाला नवस केला (सगळे हसत आहेत. दगडू गोंधळलेला)
सूत्रधार : बोल, बोल!
दगडू : म्हनलं, “द्येवा रे, माजा प्वार जगू दे मुलगा झाला तर त्येचं नाव गोट्या आन् मुलगी झाली तर गिट्टी ठिवीन!”
एक : मग शेवटी झालं काय?
दगडू : (हात जोडत) गिट्टी! (सगळे हसतात)
सूत्रधार : कुठं राहतोस तू?
दगडू : हे काय वर गाव दिसतंय नव्हं?
सूत्रधार : हां दिसतंय की! काय नाव गावाचं?
दगडू : डोंगुरवाडी.
सूत्रधार : (प्रेक्षकांना) तर मंडळी, हा दगडू धोंडू फत्तरे… राहणार डोंगरवाडी! ह्या दगडांच्या देशात राहायला याच्याइतका लायक माणूस दुसरा शोधून सापडायचा नाही!
दगडू : (भाबडेपणाने) आभारी आहे तुमचा सरकार!
सूत्रधार : अरे आभार काय मानतोयस, तुझं कौतुक नाही करत तर अक्कल काढतोय मी जगासमोर!
दगडू : (गोंधळलेला) म्हजी कसं म्हणता?
सूत्रधार : ते पण समजावून सांगायला पाहिजे का तुला? आपल्या कवितांचे अर्थ कसे बदलत चालले आहेत हे पहात गडकरी पश्चाताप करत बसले असतील वर स्वर्गात!
दगडू : मला सांगा सरकार,आपल्या गावात, रत्यावर, घराभवती, माळरानावर, डोंगरावर, झालंच तर शेहरात- जिकडं बगाल तिकडं दगूडच दगूड दिसतात नव्हं?
सूत्रधार : हो, पण काही दगड असे असतात की ते
दिसत नाहीत आपल्याला!
दगडू : दिसत नाहीत?
सूत्रधार : कारण ते आपल्या डोक्यात असतात!
(सर्वजण हसत आहेत. दगडू गोंधळलेला.)
सूत्रधार : ( साऱ्यांनाजणू फैलावर घेत) स्वत:च्या मूर्खपाणाला हसताना लाज वाटायला हवी तुम्हाला.
सर्व : (खोट्या पश्चातापाने ओशाळत) च् च् च् च्च्!
सूत्रधार : माना खाली जायला पाहिजे होत्या तुमच्या!
सर्व : (माना खाली घालतात)
सूत्रधार : गेल्या लगेच बैलासारख्या माना खाली. अरे, जरा ताठ मानेनं जगायला शिका!
सर्व : (माना ताठ, छाती पुढे काढून उभे)
सूत्रधार : (ऑर्डर देतो) सावधान!
सर्व : (सावधान होतात)
सूत्रधार : विश्राम!
सर्व : (विश्राम होतात)
सूत्रधार : बस म्हटलं की?
सर्व : बसायचं!

सूत्रधार : उठ म्हटलं की?
सर्व : उठायचं!
सूत्रधार : स्वतःचं डोकं चालवायचं?
सर्व : नाही!
सूत्रधार : (गुरूजींसारखं समजावत) अरे, बाणेदारपणे जगता आलं पाहिजे माणसाला. जगायचं कसं हे नेमकं कळायला हवं त्याला. अभ्यास हवा, आयुष्याला शिस्त हवी, कर्तव्याची जाणीव हवी, स्वातंत्र्याचा अर्थ कळायला हवा… काय?
सर्व : (माना डोलवत आवेशात गाऊ लागतात)
कर्तव्यदक्ष भूमी सीता-रघुत्तमाची
रामयणे घडावी येथे पराक्रमाची
शिर उंच उंच व्हावे हिमवंत पर्वतांचे
आ चंद्र-सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे!
('स्वातंत्र्य भारताचे' या शब्दांवर अडकल्यासारखे तीन-चार वेळा त्या शब्दांचा पुनरुच्चार करतात)
सूत्रधार : अरे थांबा,थांबा, थांबा! (प्रेक्षकांना) मंडळी, हे लोक काही सुधारणार नाहीत.अडकले पुन्हा 'स्वातंत्र्या'वर!
एक : म्हजी कसं म्हणता नेमकं?
सूत्रधार : असंच 'स्वातंत्र्य स्वातंत्र्य' करत बसलात तर एक दिवस अचानक कोणीतरी येईल आणि तुमचं हे आहे नाही ते स्वातंत्र्यसुद्धा झडप घालून घेऊन जाईल.
दगडू : झडप घालून? म्हजी घार जशी अचानक आकाशातनं येऊन कोंबडीचं पिल्लू पळवून नेती तसंच ना?
सूत्रधार : अगदी बरोबर! कळायचं सुद्धा नाही आपल्याला आणि मग तोंडाचा आऽऽऽ करण्याशिवाय काहीही राहणार नाही हातात आपल्या!
मुक्या : (हाफ पॅन्ट, वर फाटलेली मळकट बनियन. डोक्यावर टोपी. तोंडाचा आऽऽऽ करून पुढे येत निवेदकाला काही सांगण्याचा प्रयत्न करू लागते.) आऽ आऽ आऽ आऽऽऽ
सूत्रधार : तुला काय झालं आ आ करायला? कोण तू?
मुक्या : (आऽऽ आऽऽ आऽऽ करत राहतो)
सूत्रधार : काय म्हणायचंय तुला नेमकं?
मुक्या : (आऽऽ आऽऽ आऽऽ करत राहतो)
सूत्रधार : कोणी सांगेल का काही?
दगडू : हा आमच्या गावातला मुक्या. मित्र हाय तो माझा. जल्मापासनं मुका हाय.
सूत्रधार : अरेरे, फार वाईट! (दगडूला) पण काय म्हणायचंय काय याला नेमकं?
मुक्या : आऽऽ आऽऽ आऽऽ ( माझ्या हातातलं स्वातंत्र्य काढून घेऊन कोणीतरी निघून गेला असं त्याला म्हणायचं असतं. तो तसा प्रयत्न करत राहतो…)
सूत्रधार : अच्छा, अच्छा आलं लक्षात! कोणीतरी तुझं स्वातंत्र्य हिरावून घेऊन गेलेलं दिसतंय…
मुक्या : (मान हलवत 'बरोबर' या अर्थी) आऽऽऽ,आऽऽऽ
सूत्रधार : कुणी नेलं?
मुक्या : (सांगण्याचा प्रयत्न करत) आऽऽ आऽऽ आऽऽ…
सूत्रधार : कुणी, तुझ्या मालकानं?
मुक्या : आऽऽ आऽऽ आऽऽ… (नाही नाही)
सूत्रधार : मग तुझ्या शेजाऱ्यानं?
मुक्या : आऽऽ आऽऽ आऽऽ… (नाही नाही)
सूत्रधार : मग कुणी? तुझ्या बायकोनं?
मुक्या : आऽऽ, आऽऽ, आऽऽ… (नाही नाही)
सूत्रधार : अरे मग कुणी?
मुक्या : (प्रयत्न सुरूच) आऽऽ आऽऽ आऽऽ…
सूत्रधार : बरं का मंडळी याचं स्वातंत्र्य कुणीही हिरावून घेतलेलं नाही. तर हा स्वत:च ते हरवून बसलेला आहे.

मुक्या : (बरोबर ओळखलं या अर्थी खुशीने  “आऽऽऽ, आऽऽऽ…” करू लागतो)
एक : (सूत्रधाराला) हे बघा तुम्ही काहीही करा पण याचा  हा आऽऽऽ आधी बंद करा.
सूत्रधार : इतकी सोपी गोष्ट नाही ती!
दोन : का - का?
सूत्रधार : त्यासाठी त्याला त्याचं स्वातंत्र्य परत मिळवून द्यावं लागेल.
दोन : एवढंच ना! (इतराना) चला रे चला, याचं स्वातंत्र्य कुठं दिसतंय का, पाहू या आपण!
(“चला… चला ” म्हणत सर्वजण रंगमंचावर शोधाशोध करू लागतात. पार्श्वभूमीवर थीम म्युझिक वाजत आहे. कोणी जमिनीवर वाकून, कोणी डोळ्यावर हात घेऊन आभाळात बघतो. कोणी खिसे चाचपतो. कोणी हातात भिंग घेऊन शोधत असल्यासारखी कृती करतो… हे चालू असताना…)
एक : आयला कुठं गेलं एकाएकी?
दोन : तुमाला दिसलं का हो कुठं?
तीन : सकाळी तर व्हतं…
चार : अभी अभी तो हमने साथ मे चाय ली!
(अशी शेरेबाजी चालू. शेवटी सर्वजण कंटाळून “दमलो, दमलो”, “दमलो बुवा”, “अजिबात सापडत नाही”,”काय करावं?” असं म्हणत अखेरच्या आशेनं सूत्रधाराकडे पाहतात. मुक्या या प्रकाराकडे गोंधळून पहात आहे.)
सूत्रधार : मी तुम्हाला म्हटलं होतं ना की याचं स्वातंत्र्य याला परत मिळवून देणं ही ‘अवघड गोष्ट’ आहे म्हणून!
पाच : मग तुम्ही आम्हाला ‘सोपी गोष्ट’ का सांगत नाही?
सहा : हां... हां... सोपी गोष्ट सांगा की जरा!
सूत्रधार : म्हणजे सगळं सोपं करून सांगायचं असंच ना?
सर्व : हां... हां... अगदी बरोबर!
सूत्रधार : (प्रेक्षकांना) मंडळी! प्रत्येक गोष्ट सोपी करून हवी असते आपल्याला! प्रवाहाबरोबर वाहत जाणं आवडतं आपल्याला, कारण ते सोपं… त्यासाठी काहीच कष्ट करावे लागत नाहीत!
दोन : अगदी बरोबर!
सूत्रधार : प्रवाहाच्या विरूद्ध दिशेनं पोहत जाणं हे कठीण. त्यासाठी हातपाय मारावे लागतात, मेहनत करावी लागते!
एक : भाषण डोक्यावरनं जातंय साहेब, त्यापेक्षा गोष्ट सांगा की एखादी चांगली-सोपी!
सूत्रधार : बरं, मग राजाराणीची सांगू का?
सर्व : नक्को,नको…
सूत्रधार : मग चिऊ-काऊची?
सर्व : ती पण नको!
सूत्रधार : मग राक्षसाची?
सर्व : नक्को बुवा!
सूत्रधार : मग भुताखेतांची?
सर्व : नक्को गं ऽऽऽ ‘बाई’!
सूत्रधार : मग काय तमाशात नाचणाऱ्या बाईंची सांगू?
सर्व : (सगळे आनंदाने, शिट्टया मारत, हवेत शेले, टोप्या उडवत असल्याप्रमाणे हे ऽऽऽ करून ओरडतात. ढोलकी वाजते. एक मुलगी पदर वर घेऊन तमाशात नाचत असल्यागत गिरक्या मारत पुढे येते. बाकीचे तिला दाद देत आहेत. ऐन रंगतीच्या क्षणी सूत्रधार ओरडतो)
सूत्रधार : थांबा थांबा! स्टॉप इट्! आय से स्टॉप इट्! अरे काय चाललंय काय हे? बाई म्हटलं की पाघळले सर्व!
सर्व : (खोटे ओशाळत) शी शी शी शी!
सूत्रधार : बाई म्हटलं की तोंडाला पाणी सुटतं सगळ्यांच्या!
सर्व : (कान पकडत) राम राम राम राम!
सूत्रधार : बाई म्हटलं की म्हाताऱ्यालाही बाळसं येतं लगेच!
सर्व : शांतम् पापम् … शांतम् पापम्!

सूत्रधार : बाई म्हटलं की?
सर्व : मज्जाच मज्जा !
सूत्रधार : (संतापत) बस झाला हा लाळघोटेपणा! (शांतता)
(प्रेक्षकांना) मंडळी, आपण वरवर कितीही नाही म्हटलं तरी बाई हा आपला विक पॉईंट! मजा मारण्याची, टाईमपास करायची गोष्ट!
सर्व : (खोट्या पश्चातापाने) च्च् च्च् ... च्च् च्च् ...
सूत्रधार : एका बाजूनं आपण तिला देव्हाऱ्यात ठेवतो आणि दुसरीकडनं तिच्यावर जुलुम-जबरदस्ती, अत्याचार करत राहतो.
सर्व : खरंय,खरंय!
सूत्रधार : तिला आपण कायम पारतंत्र्यात ठेवलं.
सर्व : अगदी बरोबर!
सूत्रधार : याला कारण काय?
सर्व : काय, काय?
सूत्रधार : कारण कुणीतरी आपल्याला तसं शिकवलेलं आहे! कुणी शिकवलं आहे?
सर्व : आपल्या महाऽऽऽन संस्कृतीनं!
सूत्रधार : शाब्बास! सांगितलं तेवढं?
सर्व : ऐकायचं!
सूत्रधार : बस म्हटलं की?
सर्व : बसायचं!
सूत्रधार : उठ म्हटलं की?
सर्व : उठायचं!
सूत्रधार : प्रश्न विचारायचे?
हणम्या : नाहीत.
सूत्रधार : अरे,जग बदललंय आता!
सर्व : म्हणजे?
सूत्रधार : पुढं जायचं तर ज्ञानाचं महत्त्व कळलं पाहिजे, स्वातंत्र्याचं मोल लक्षात आलं पाहिजे आणि बाईचा सन्मान करता आला पाहिजे माणसाला!
एक : वा क्या बात है!
सूत्रधार : पटलं ना?
एक : अगदी पटलं!
सूत्रधार : मग आता ते जुनं चित्र बदलायला नको?
सर्व : (निघत) चला! चला!
सूत्रधार : कुठं चला?
सर्व : चित्रं बदलायला!
सूत्रधार : काय निर्बुद्ध आहात रे तुम्ही! हे चित्रं बदलायचं म्हणजे काय टोपी बदण्याइतकं सोपं वाटलं का तुम्हाला? चालले लगेच मेंढरासारखे... खरंच एकजात सगळे दगड आहात तुम्ही, काय समजलं?
सर्व : आम्ही सगळे दगड आहोत!
सूत्रधार : म्हणून मग मी तुम्हाला दगडाचीच गोष्ट सांगणार आहे. (आवेशात) 'आपरेशऽऽऽन दगड!'
सर्व : ढँ... ट... ढँऽऽऽण!
एक : दगडाची गोष्ट म्हणजे विषय अगदी नवा आहे.
दोन : महाराष्ट्राला जवळचा आहे.
तीन : मराठी माणसाला अधिकच जवळचा आहे!
सर्व : (खिदळत) ऐ शबास!
सूत्रधार : या विषयावर नाटक होऊ शकतं.

सर्व : शब्बास!
सूत्रधार : सिनेमा होऊ शकतो.
सर्व : शब्बास!
सूत्रधार : मालिका होऊ शकते.
सर्व : शब्बास!
सूत्रधार : वेब सिरीज होऊ शकते!
सर्व : हो की!
सूत्रधार : लोकांचं भरपूर मनोरंजन होऊ शकतं.
एक : हे अधिक महत्त्वाचं!
सूत्रधार : डोक्याला व्याप नाही.
चोख्या : उद्याची चिंता नाही.
सूत्रधार : दुसऱ्याचा विचार करण्याची गरज नाही.
तीन : जो होगा वो देखा जायेगा!
चार : खावो पिवो मजा करो!
पाच : दुनिया गई
सर्व : जहन्नूम मे!
सूत्रधार : मग करू का सुरू?
एक : एक मिनीट थांबा!
सूत्रधार : आता काय झालं?
(तो एक चालीवर गाऊ लागतो. इतर साथ देत आहेत.)
चिऊ-काऊची नको, राजा-राणीची नको,
डोके खाणारी नको,संदेश देणारी नको
परीक्षा घेणारी नको, जुन्या काळातली नको
गोष्ट तुम्ही सांगा नवी दगडाची
वेळ झाली आमची आता झोपेची
वेळ झाली आमची आता झोपेची…आता झोपेची!
(सर्वजण उभ्या उभ्या माना टाकून जणू झोपी जातात.)
सूत्रधार : अरे झोपताय काय मुर्खांनो? गोष्ट ऐकायचीय ना?
एक : त्यासाठीच वातावरण निर्मिती करत होतो आम्ही!
सूत्रधार : बरं मग उठा, जागे व्हा आणि चला माझ्याबरोबर!
एक : पण जायचं कुठं?
सूत्रधार : अर्थातच डोंगरवाडीवर. या दगडूच्या गावाला! दगडू, तू आणि मुक्या तुम्ही दोघांनी रस्ता दाखवायचा…
दगडू : हो हो चला की, या माझ्या मागं मागं!
सर्व : चला, चला !
सूत्रधार : (सर्वजण दगडूच्या, मुक्याच्या मागोमाग निघाले आहेत. सूत्रधार गात आहे. इतर त्याला साथ देत आहेत.)

: झोपलेल्या माणसा रे उठ जागा हो अता,
माणसाच्या जागराची ऐक ही न्यारी कथा…

: साध्या-भोळ्या माणसाची, सरळ-सोपी ही कहाणी,
सत्य, शिव अन् सुंदराची मांडणी सोपी शहाणी
माणुसकी हा श्वास ज्याचा, थोर मनीची दिव्यता
माणसाच्या जागराची ऐक ही न्यारी कथा…

( सर्वजण गाणे म्हणत म्हणत, गोलाकार फिरत,वर चढत जणू  गोष्टीतल्या गावी येतात.)

*

प्रवेश दुसरा. स्थळ : डोंगरवाडी.

सूत्रधार : तर मंडळी, ही डोंगरवाडी! पाच-पंचवीस घरांचं अगदी छोटसं गाव.
एक : (खूप थकलेला. पाय दाबत) बाबाबाबाऽऽऽ आधी गायत्री नदी ओलांडावी लागली. मग पहिल्या डोंगरावर आंबेवाडी गाव, दुसऱ्या डोंगरावर जांभूळझरी गाव आणि   मऽऽऽग तिसऱ्या डोंगरावरचं हे डोंगरवाडी!
दोन : अयाई गऽऽऽ, लय अवघड रस्ता!
तीन : पायाचे अगदी तुकडे पडले वर येता येता.
चार : कशी काय माणसं राहतात इथं देव जाणे!
सूत्रधार : (प्रेक्षकांना) इकडच्या मागच्या बाजूला ते छोटंसं मैदान दिसतंय ना, तिथं गाईगुरं चरतात, मुलं खेळतात. आणि इकडच्या बाजूला हे दिसतंय ते भैरीचं मंदिर!
(दोघे-तिघे तिकडे पहात भक्तीभावांनं हात जोडतात)
सूत्रधार : अजून एक लक्षात आलं का?
एक : काय? काय?
सूत्रधार : तो ऽऽऽ वरच्या बाजूचा मोठा डोंगर दिसला का?
दोन : (पहात) अरे बापरे! अजून वर डोंगर? बाबाबाबा!
सूत्रधार : त्याच्या माथ्याला दिसतंय ते शंकराचं मंदिर! आणि त्याच्यावर फडकणारा तो भगवा झेंडा दिसला का?
तीन : हो दिसला की!
चार : बाबाबाबा!
सूत्रधार : तिथं वर जाण्यासाठी एक अतिशय अवघड पायवाट आहे. पलीकडच्या बाजूने खाली गावात सुद्धा उतरता येते. शहरातली काही धाडसी मुलं कधीतरी वर ट्रेकिंगला जाण्यासाठी ती वापरतात, बाकी कोणी त्या वाटेच्या नादाला लागत नाही.
एक : (पाय दाबत) अयाई गऽऽऽ कोण कशाला मरायला जाईल तिथं?
सूत्रधार : मात्र डोंगरवाडीत एक माणूस असा आहे की जो दरवर्षी महाशिवरात्रीला झेंडा घेऊन त्या वाटेनं वर जातो आणि कळसावर झेंडा लावूनच परत येतो.
दोन : कमाल म्हणायची!
हणम्या : (पुढे येत) म्याच जातुया नव्ह का?
सूत्रधार : तू?
हणम्या : (हात जोडून) व्हय जी!
सूत्रधार : काय नाव तुझं?
हणम्या : हणम्या! वर मधाची पोळी काढायापण दरवर्षी म्याच जातो नव्हं?
सूत्रधार : अच्छा अच्छा, आलं लक्षात! एवढं अवघड काम करतोस तू, तुझा तर सत्कारच करायला पाहिजे आम्ही!
हणम्या : (हात जोडत) “येवढं काय इशेष नाय त्यात, पुण्याचं काम ते!
तीन : वा, शाब्बास!
हणम्या : हर हर महादेव! शंभोऽऽऽ शिवशंकर! (असं म्हणत मागे जाऊन इतरांच्यात मिसळतो)
एक : अशी गावं ओस पडत चाललीत आता.
दोन : जो उठतो तो शहरात धावतो.
तीन : कारण शहरात मोबाईलला रेंज मिळते!
चार : शहरात नाटक-सिनेमा बघायला मिळतो!
अब्दुल : (लुंगी, बनियन, ‘स्कल कॅप’ अशा वेशातील अब्दुल पुढे येत) शहरमे पिझ्झा-बर्गर खानेकु मिलता है.
सूत्रधार : (त्याला) आपण कोण?

अब्दुल : मै अब्दुल!
सूत्रधार : काय करतोस तू?
अब्दुल : दुसरा क्या करेगा? मुर्गी-बकरा काटके मटन बेचता हूं आजूबाजूमे…
सूत्रधार : म्हणजे तुला वगळून गावाचा विचारच करता येत नाही!(अब्दुल हसत हसत 'शुक्रिया साबजी'असे म्हणत मागच्या रांगेत जाऊन मिसळतो)
एक : काय सुंदर परिसर आहे हो!
दोन : अगदी चित्र काढावं तसं वाटतंय!
तीन : अगदी सिनेमा बघितल्यागत वाटतंय!
चार : अगदी सहलीला यावं तसं वाटतंय!
पाच : असं गाव एखाद्या सिनेमात नाहीतर चित्रातच बघायला मिळतं हल्ली!
सूत्रधार : फार रोमँटिक होऊ नका! खाली जाणारी ही एकमेव वाट सोडली तर डोंगरवाडीला जगाशी संपर्क साधायला दुसरं काहीही साधन नाही हे लक्षात घ्या!
एक : ते पण खरंच हाय म्हणा!
सूत्रधार : तर एकदा काय झालं?
सर्व : काय झालं?
सूत्रधार : रात्रीच्या वेळेला अचानक वरनं एक दरड कोसळली. डोंगरमाथ्यावरून एक भला मोठा दगड सुटला, गडगडत गडगडत खाली आला आणि या एकुलत्या एक वाटेवर येऊन पडला...
एक : अरारारा!
दोन : जगाशी संपर्क साधणारी एकमेव वाट बंद झाली!
तीन : लय वाईट झालं म्हणायचं!
चार : बिचारे गावकरी!
पाच : काय झालं असेल हो त्यांचं?
सूत्रधार : तेच सांगतोय मी तुम्हाला!
सहा : हां,सांगा,सांगा!
सूत्रधार : तर झालं बुवा, सकाळ झाली… (एकजण कोंबडा आरवण्याचा आवाज काढतो.) सूर्य उगवला… (एकजण "सूर्य उगवला प्रकाश पडला…" ही ओळ आळवतो.) घरट्यातून पाखरं बाहेर पडली… (काहीजण चिवचिवाट करतात.) गोठ्यातून गुरं बाहेर पडली… ( काही हंबरण्याचे आवाज) आणि पहाटेच्या वेळेला अनुसरून ...
(अब्दुल हातात टमरेल घेऊन प्रातर्विधीसाठी बाहेर पडतो. इकडे तिकडे पहात पुढे येतो. एक जागा बघून टमरेल खाली ठेवत लुंगी वर करणार तोच दोनतीन कुत्री त्याच्या अंगावर भुंकू लागतात. अर्थात् भुंकण्याचा आवाज काही पात्रेच काढत आहेत… "हाड् हाड्" करत तो उठतो आणि दुसरी जागा पाहायला लागतो. पुन्हा बसणार एवढ्यात पुन्हा कुत्री भुंकू लागतात. त्या धावपळीत त्याला रस्त्यावर पडलेला तो भलामोठा दगड दिसतो. तो आश्चर्यचकित झालेला...

प्रेक्षकांच्या उजव्या अर्थात् रंगमंचाच्या डाव्या बाजूला पुढील कोपऱ्यात भला-मोठा अदृश्य दगड. त्याचा काही भाग स्टेजवर कोपऱ्यात तर बराचसा भाग विंगेच्या आत आहे अशी कल्पना. त्या कोपऱ्यातून दोन-अडीच फूट लांबीची काळ्या कापडाने झाकलेली एक ओबडधोबड लेव्हल बाहेर आलेली आहे. ती थोडी उंच करण्यासाठी तिला आतून एखादी पायरी देता येऊ शकते. ती लेव्हल हा त्या दगडाचाच एक भाग आहे. रंगमंचावरील दगडाचे ते पूर्ण क्षेत्र नीट आखून घेऊन तेथील हालचाली बांधायच्या आहेत. दगडाच्या वरच्या कोपऱ्यातील मोकळी जागा विंगेतील मैदानाकडे जाण्या-येण्याची वाट.)
अब्दुल : बा बा बा बा! कितना बडा पत्थर है ये! मगर ये यंहापेच कैसे क्या गिर गया? पुरा रास्ताच बंद कर दिया की इसने! अब क्या करेंगे? हागणदरी तो नीचे रह गई. (इकडे तिकडे पहात) अभी नही रुक सकता मै… बैठता इधरच पत्थर के बाजूमे! (टमरेल खाली ठेवतो. लुंगी वर करून 'बसणार' तोच काही गावकरी ओरडत बाहेर येतात.)
बाज्या : ए उठ,उठ ऽऽऽ …
गणप्या : आरं तुला काय लाज का शरम?

हणम्या : तुला काय अक्कल का बिक्कल?
पांडू : तुला काय हे का ते?
व्यंक्या : एवढा मोठा घोडा झालास, हितंच बसतोस होय?
अब्दुल : पर मै क्या करू?
व्यंक्या : क्या करू मतलब? तुम्हा लोकांना फक्त घाण करायची एवढंच माहीत का रे?
अब्दुल : देख व्यंक्या, मेरे समाज को बीच मे मत ला!
व्यंक्या : एवढी हागणदरी हाय खाली, तिकडं जा की!
अब्दुल : मगर निचे जाने के लिए रास्ता नही होना?
व्यंक्या : रास्ता?
अब्दुल : अरे ये पत्थर दिखता नही क्या तुझे? (आता सर्वांना एकदम दगड दिसतो आणि ते खडबडून जागे होतात. इकडून तिकडून दगड न्याहाळू लागतात.)
चोख्या : च्यामारी आक्रितच झालं म्हनायचं...
हणम्या : हा कुठनं आला इथं?
गणप्या : (प्यायलेला) आणि नेमका हितंच कसाकाय अडकला म्हणायचं?
पांडू : अरे हां... वर शंकराच्या देवळापाशी व्हता हा! सुटला वाटतं तिथंनं खाली...
गणप्या : बा!बा! बा!बा!(दगडाखाली निरखत) इथं हातभर रुंदीचं भगदाड पडलं व्हतं काल! त्या भगदाडाच्या तोंडावरच येऊन अडकला हा नेमका!
बाज्या : कालच सौशयाची पाल चुकचुकली व्हती मनात.
गणप्या : नशीब आपल्या कुणाच्या घरावर पडला नाही ते!
पांडू : ते खरं हाय पण समदी वाट आडीवली की ह्यानं...
(अशी शेरेबाजी करत, जवळ जाऊन, लांबून, हात लावून कुतुहलाने दगडाचे निरीक्षण करू लागतात.)
अब्दुल : अभी बताव कैसे जाऊंगा मैं नीचे?
चोख्या : ते पण खरं आहे म्हणा तुझं!
(गडबड ऐकून काही बायका, गावकरी बाहेर येतात)
सखुबाई : म्या म्हंते सकाळी सकाळी असा कांगावा कश्यापाय चाललाय रं बाबानो तुमचा?
बाज्या : ह्यो एवढा मोठा दगूड दिसत न्हाय व्हय सखुबाई?
सखुबाई : (पाहात) आगंबाय खरंच की. बयाबया बया! (हाक मारत) मंजे ऽऽऽ, आगं ए मंजुळे, भायेर ये आधी!
मंजुळा : कश्यापायी बोंबालती गऽऽऽ सकाळी सकाळी?
सखुबाई : (तिला) आगं ह्यो दगूड बघितलास का कसा रेड्यावानी पडलाय वाटत त्यो?
मंजुळा : (दगड पाहून चकित झालेली) खरंच की हो सखुबाई! माय वो! समदी वाटच बंद केली की त्यानं...
मंजुळा : आता म्या भाजीपाला, दूध घेऊन आंबेवाडीत कशी काय जानार ग बया?
सखुबाई : खरं हाय तुझं.
मंजुळा : पुष्पीला ताप हाय माझ्या, तिला दवाखान्यात पण न्हेयाचं व्हतं आज.
सखुबाई : अग बया!
मंजुळा : काय करावं आता?
सुशीला : मुलांच्या शाळेचं काय होणार आता? कशी जाणार ती शाळेत?
(आठ-नऊ वर्षे वयाची चंद्या आणि पमी ही दोन मुले हातात हात घेऊन उड्या मारत “ए ऽऽऽ शाळेला सुट्टी, शाळेला सुट्टी!” असं म्हणत नाचू लागतात. “गप्प बसा की रे कार्ट्यानो” म्हणत सखुबाई त्यांना गप्प करतात)
मंजुळा : दूधपण फुकट जानार आता माझं समदं!
बाज्या : (तिला न्याहाळत) तुजं दूद कश्यापायी फुकट जातंय ग मंजुळे?
मंजुळा : (पदर खोचत) मुडदा बशिवला तुजा, काळतोंड्या, तुला कोणी आया-बहिणी हायेती का न्हायी?
म्हातारी : (कमरेत पोक, हातात काठी. त्याच्या अंगावर जात) तू कशाला तिच्या वावरात तोंड घालतोस रे भाड्या? या दगडाचं काय करायचं ते बघ की आधी!
एक : (कान पकडत) तसं म्हणायचं नव्हतं मला म्हातारे, सॉरी, सॉरी!

मंजुळा : काय सॉरी? चांगली वळखते मी तुला!
एक : सॉरी म्हटलं ना एकदा!
व्यंक्या : (एकदम) पाटील आले, पाटील आले… बाजूला व्हा! बाजूला व्हा! ( पाटील पुढे येतात. दोघे तिघे त्यांना रामराम करतात. ते "राम राम" म्हणत पुढे येतात. येता येता सखुबाईकडे रोखून पाहतात. ती डोक्यावर पदर घेत मान फिरवते.)
पाटील : सकाळ सकाळ भांडताय कश्यापाय असं?
पांडू : ह्यो दगूड पडलाय हितं त्यो बघा की पाटील! समदा रस्ता बंद केलाय त्यानं…
पाटील : दगूड? अरे बापरे, खरंच की! (सर्व बाजूंनी दगड निरखून पाहू लागतात. तो एका छोट्या भगदाडावर टेकलेला. त्या आधारानेच तो तेथे अडकलेला आहे, हे त्यांच्या लक्षात येते. बाजूने खाली फुटभर रुंदीची फट. त्या फटीतून ते खाली डोकावून पाहात) आयला हे भागदाड कसं काय पडलं इथं? आधी तर नव्हतं…
हणम्या : काल सांच्यालाच पडलंय ते, म्या पाह्यलं व्हतं... दगूड वरनं आपटत, आदळत आला खाली,आधार मिळाला त्याला आणि अडकला इथं!
पाटील : (विचार करत) काहीतरी मार्ग काढाया हवा आता.
सुशीला : दगड काढला नाही तर शाळा बुडंल पोरांची…
(चंद्या, पमी "हे ऽऽऽ…" करून ओरडतात. सखुबाई त्यांना "गप्प बसा रे कार्ट्यानो!" म्हणत दटावतात)
बाज्या : किराणाचं दुकान खायल्या अंगाला ऱ्हायलं. आता डाळ-तांदूळ, चहा-साखर कुठनं आनायचं?
गणप्या : पाव-बटर पण मिळायचं ऱ्हाय आता…
मंजुळा : माजा भाजीपाला आन दूध पडूनच ऱ्हानार की आता!
सखुबाई : दवाखानाबी खालीच हाये. औषधपाणी कसं काय आणायचं?
मंजुळा : माझी पुष्पी तापानं आडवी झालीय! डोकं पण लय दुखतंय तिचं... काय करावं मी? (पाटील तिच्याकडे रोखून पाहतात. ती मान फिरवते.)
बाज्या : आन् आसं बगा पाटील, रंगूबायचा तमाशाचा फड खायल्या अंगाला ऱ्हायला नव्हं? तिकडं ढोलकी वाजाया लागली की जीव कसा (झुलत) चाटमुट-चाटमुट, चाटमुट- चाटमुट करतोय माझा!
सुशीला : जनाची नाय तर मनाची तरी बाळगा की जरा!
म्हातारी : घरची पुरणपोळी सोडून बाहेर श्यान खाण्याची बुद्ध्या, दुसरं काय?
पाटील : असू द्या, असू द्या! तमाशाचा नाद वाईट पण त्याची अडचण झाली हे काय खोटं नाय…( सखुबाईकडे रोखून पहात) आणि आपल्याला तरी आवडलेलं हाय का त्ये? ("नाय नाय" करत सर्वजण माना डोलवतात सखुबाई डोक्यावर पदर घेऊन नजर फिरवतात)
गणप्या : (आता त्याला आणखी चढलेली…इकडे तिकडे झुलत, तोल सावरत) पण मी काय म्हणतू?
हणम्या : (त्याला आतल्या अंगाला ओढत) हिकडं हो आधी, नाहीतर जाशील खाली डायरेक्ट गायत्रीत!
चोख्या : सकाळी सकाळी ढोसून आलाय साला!
गणप्या : पर माझं ऐकून…
हणम्या : गप बसतो का हाणू आता चेपलेनं?
नामदेव : (हा गावातील एक हुशार तरुण. पुढे येत-) पाटीलसाहेब, दगड नेमका वाटेवर पडल्यामुळं सर्वांची अडचण झालीय हे खरं हाय पण नुसती चर्चा करून काय होणार आहे? त्यापेक्षा आपण सर्वांनी ताकद लावून तो बाजूला ढकलून वाट मोकळी करूया की!
पाटील : येडा का खुळा तू? येवढा मोठा दगूड कसा काय ढकलायचा? मरायचं हाय का फुकट?
नामदेव : काय चुकीचं बोलतोय मी?
पाटील : ऐका रं गावकऱ्यांनो, कालिजात जाऊन चार बुकं शिकलं की आक्कल येती का सांगा?
नामदेव : आपण सर्वांनी ताकद एकवटून ढकलला तो तर वाट मोकळी होणार नाही का लगेच?
पाटील : पण मला सांग, दगड ढकलला आणि तो गडगडत जाऊन खाली नेमका जांभूळझरीवर पडला आणि पाचपन्नास माणसं खलास झाली तिथली तर?
हणम्या : बापरे खरंच की! हे लक्षातच नाही आलं माझ्या!
बाज्या : माझ्या पण नाय लक्षात आलं!

व्यंक्या : (नामदेवला उद्देशून) अक्कल काय नुसती पुस्तकं वाचून येत नाही!
पाटील : दगड ढकलला आणि काय गडबड झाली तर त्याची जबाबदारी घेणार का तू?
नामदेव : असं कसं म्हणता तुम्ही? जांभूळझरी राहिली 'अशी या बाजूला' आणि गायत्री नदी 'अशी ह्या बाजूला'! मधी अंतर किती आहे ते तरी बघा! दगड ढकलला तर खाली सरळ गायत्री नदीत पडणार हे स्पष्ट दिसतंय अगदी.
पाटील : ते काय शाळेत भूमितीची आकृती काढण्यासारखं सोपं आहे का? गेला तो येडा-वाकडा खाली तर?
नामदेव : (दुसरा उपाय सुचवत) मग हा किंचित थोडासा इकडं हटवून जाण्यायेण्यापुरती वाट तरी पाडू या!
पाटील : पुन्हा तेच? आपला कंट्रोल हाय का त्याच्यावर? तो काय जावई हाय का आपला आपण म्हणू ते ऐकाया?
(सर्व दाद देत हसतात)
नामदेव : मग ह्या वरच्या बाजूनं डोंगराची थोडी माती काढून जाण्यायेण्यापुरती वाट केली तर? म्हणजे कामं तरी अडणार नाहीत. कॉलेज बुडतंय, परीक्षा जवळ आलीय… पार्ट टाइम नोकरी हाय माझी ती पण जाईल अशानं!
पाटील : वरनं माती काढायची म्हजी पुन्हा दरडी कोसळाया आवताणच झालं की!
नामदेव : माझं ऐकूनच घ्यायचं नाही असं ठरवलंय तुम्ही!
पाटील : माझा काय आग्रव नाय पण उद्या काय गडबड झाली, काय आक्षीटन झाला तर माझ्याच तोंडात श्यान घालत्याल का नाय लोक?
(सर्वजण 'खराय,खराय' म्हणत पाटलांची बाजू घेतात)
पाटील : आपण असं करू, संध्याकाळी ग्रामस्थांची मीटिंग घेऊ चावडीवर आणि त्यात डिशीजन घेऊ काय तो!
व्यंक्या : हो बरोबर! बरोबर!
अब्दुल : (हातातलं टमरेल वर करत) तुम्हारी मीटिंग तो हो जाएगी मगर मै क्या करू तब तक?
हणम्या : अरं जा की तिकडं वर मोकळ्या मैदानात!
बाज्या : (अब्दुलकडे पहात) आन् तुझीच काय एकट्याची अडचण नाय झाली बरं का?
पाटील : आता हा दगड इथनं हटेपर्यंत समद्यांना तिकडंच जावं लागणार हाय मोकळ्या अंगाला!
चोख्या : दुसरा काही इलाजच नाय ऱ्हायला!
व्यंक्या : (अब्दुलला) अन तू पण साला – जवा बघावं तवा तुझ्या हातात टमरेल!
अब्दुल : फातिमा मायके गई है … कच्चा-पक्का बनाके खाना पडता है…पेट खराब है, मै क्या करू, तुमीच बोलो!
व्यंक्या : सांगितलं ना? जा तिकडं वर मैदानात म्हणून! नाहीतर जा तिच्यायला पाकिस्तानात!
अब्दुल : देख व्यंक्या, भारत-पाकिस्तान का झमेला मत निकाल! आपना सब अच्छा चल रहा है गाव मे.
व्यंक्या : क्या करेगा तू?
अब्दुल : मै क्या करुंगा? क्या करुंगा? आयाय गे ऽऽऽ… (कंट्रोल होत नाही.) मा गे ऽऽऽ (करत तिथेच बसतो.)
व्यंक्या : शिंच्यानं चड्डीतच घाण केली की हो!
(सारे हसत हसत अब्दुलला कव्हर करतात. )
सूत्रधार : गावच्या या माणसाच्या काय आले संचिता…
माणसाच्या जागराची ऐक ही न्यारी कथा ऽऽऽ

(सारे साथ देत आहेत. अंधार.)

*

प्रवेश तिसरा.
स्थळ : रस्त्याच्या बाजूची चावडी.

सूत्रधार : तर मंडळी! गावात सूर्य उगवला तसा मावळलासुद्धा पण दगड मात्र होता तिथंच होता. गावचे सारे व्यवहार ठप्प झाले होते. नामदेवनं दगड हलवण्याचे दोन-तीन उपाय सांगितले होते पण पाटलाना ते पटले नाहीत. दगड हलवण्याचा प्रयत्न केला आणि तो जांभूळझरीवर पडून पाच-पन्नास माणसं मेली तर त्याला जबाबदार

कोण? अशी एक पाचरही त्यांनी मारून ठेवली होती. पाटलांच्या विरूद्ध जाण्याची कुणाची बिशाद नव्हती.
(ढुमढुम, ढुमढुम ढोलकी वाजवत दवंडीवाला येतो.)
दवंडीवाला : ऐका हो ऐका! डोंगरवाडीच्या समस्त गावकऱ्यांना कळवण्यात येते की, दगूड कसा हलवायचा यावर चर्चा करण्यासाठी आज रातच्याला चावडीवर बैठक होनार हाये हो ऽऽऽ… तरी समद्या ग्रामस्थांनी बैठकीसाठी हाजर व्हावे होऽऽऽ…
(दोनतीन ठिकाणी दवंडी देतो. त्याच्यापाठोपाठ गावकरी चावडीवर जमा झालेले. समोरून खाली जाणारी वाट. दगड अर्थात त्या वाटेवर पडलेला.) कोणी तंबाखू मळत आहे, कोणी विडी पेटवत आहे. नामदेव अस्वस्थपणे येरझारा घालत आहे. चंद्या, पमी हातात हात घालून हे ऽऽऽ करत इकडून तिकडे उड्या मारत आहेत, काहीजण त्यांना “ए गप बसा रे पोरेहो!” म्हणत दटावत आहेत. गणप्या झुलत झुलत येऊन बसतो. “पाटील आले, पाटील आले” असा गलका होतो. व्यंक्या “बाजू व्हा, एऽऽऽ बाजू व्हा” म्हणत पाटलांना घेऊन येतो. “या या साहेब…” असं म्हणत त्यांना पुढे आणतो.)
पाटील : रामराम मंडळी!
सर्व : रामराम... रामराम!
(व्यंक्या मळलेला तंबाखू त्यांच्या हातात ठेवतो. ते तो दाढेखाली ठेवतात.)
गणप्या : (झुलत) पाटीलसाहेब, लवकर काय तो निकाल लावा आणि दगड हटवायचं बघा.
मंजुळा : माझा भाजीपाला आन् दूध घरातच पडून ऱ्हायलं.
सुशीला : मला खाली शाळेत जाता आलं नाही. आधीच एक-शिक्षकी शाळा! सगळ्याच मुलांचं नुकसान होतंय...
(दोन्ही मुले “एऽऽऽ शाळेला सुट्टी!”म्हणत उड्या मारू लागतात. काही जण त्यांना दटावत खाली बसवतात.)
मंजुळा : पुष्पीला डॉक्टरकडं नेता आलं नाय अजून.
पाटील : पांडूला दाखवा,अंगारा देईल तो!
मंजुळा : अंगारा दिला त्यानं पण ताप काय उतरत नाय!
पाटील : पर काय झालंय काय तिला?
सखुबाई : ते तुमाला नाय कळायचं!
पाटील : (खोचक) म्हजी मोठी झाली म्हणा की ती आता!
म्हातारी : (जळजळीतपणे पाटलाला) तू नको त्याची काळजी करू, गावाचं बघ काय करायचं ते आधी!
व्यंक्या : (मध्ये पडत) आसं कसं? गावाचे प्रमुख आहेत ते! त्याना लक्ष ठेवावं लागतं सगळ्यांवर!
म्हातारी : तू नको शिकवू मला! उंदराला मांजर साक्षी! लावालाव्या करत फिरायचा धंदाच हाय तुझा!
पाटील : जाऊदे ग म्हातारे! पोरबुद्धी हाय त्याची. दगडाचं काय करायचं ते बघूया आधी!
म्हातारी : तेच सांगतीय मी! कोण मोठी झाली आणि कोण म्हातारी झाली या चौकशा करण्यापेक्षा गावच्या इकासात लक्ष घाल की नीट!
पाटील : आता तू शिकवतीस का मला म्हातारे?
सुशीला : नाय तर काय! काय ते ठरवा लवकर. पोरं दिसभर खोंडागत उंडारत व्हती निस्ती…
सखुबाई : मलापण औषध आनायचं व्हतं ते बी ऱ्हायलं...
बाज्या : तुला कसलं ग आवषीद आता?
हणम्या : (तिरकसपणे) तिच्या पोटात दुखतंय नव्ह?
म्हातारी : एवढं बारीक लक्ष कशाला रं तुझं तिच्यावर? सवताच्या घरात पाळणा का हालत नाही याची काळजी घे की हेमल्या! (सगळे हसतात.)
बाज्या : (चवताळून) मला हेमल्या म्हणतीस व्हय म्हातारे?
म्हातारी : नायतर कोण मोठा बाजीराव लागून गेलास तू?
पाटील : शांत व्हा, शांत व्हा! मुद्याचं बोलूया आपण! कायतरी मार्ग काढूया.
अब्दुल : मेरे दो बकरे गायब है कल से, निचे चरने को गये थे…क्या करू मैं?
व्यंक्या : इथं माणसांचं बघायचं आधी का बकऱ्यांचं? एवढं काय सोनं लागलंय तुझ्या बकऱ्यांना?
अब्दुल : क्या मतलब? आदमी कम से कम बोल सकता है, बकरे क्या करेंगे बेचारे?
व्यंक्या : बे…बे…तो करेंगे!

(सर्वजण हसत, "खाली बस आधी" म्हणत मारून मुटकून अब्दुलला बसणं भाग पाडतात.)
बाज्या : आन पाटील, रंगुबाईचा फडबी खायल्या अंगाला ऱ्हायला न्हवं? तिकडं ढोलकी वाजायला लागली की (झुलत) जीव कसा चाटमुट चाटमुट, चाटमुट चाटमुट करतोय माझा...
पांडू : गप्प की रे खुळ्या! कामाचं बोल की काय ते!
चोख्या : भायेर काढा रे साल्याला.
गणप्या : बघावं तवा डोस्कं फिरवतुय!
पाटील : (सखुबाईकडे कटाक्ष टाकत) आन् आसं बघा, रंगूबायचा फड खायल्या अंगाला ऱ्हायला हे तरी आपल्याला आवडलेलं हाय का? आपुन त्येला नावं ठेवायची म्हजी, 'मी नाय बाय त्यातली आन् लाव कडी आतली' आसंच न्हाय का? (सखुबाई डोक्यावर पदर घेत त्यांची नजर टाळत मान फिरवतात. सगळे एकमेकाच्या हातावर टाळ्या मारत दाद देतात.)
नामदेव : (संतापाने) मला वाटतं आपण नको त्या गप्पा मारत बसण्याऐवजी दगड हलवण्याविषयी चर्चा केली तर ते बरं होईल, नाही का?
व्यंक्या : ए नाम्या, जरा गप की, कशाला इनाकारण श्याणपणा करतुयास? पाटलास्नी काहीच अक्कल नाही–
गणप्या : ऑं?
व्यंक्या : (वाक्य पूर्ण करत) असं वाटतंय का तुला?
गणप्या : हां हां…
नामदेव : मी कुठं म्हटलंय तसं?
व्यंक्या : काय काम नसंल तर म्हातारीला घेऊन घरी जा, तिच्या खाण्यापिण्याचं बघ जरा!
नामदेव : ते तू नको शिकवू मला!
व्यंक्या : शिकण्याचं लायसन्स आपल्याकडचं हाय फकस्तं असं समजू नको!
नामदेव : नाय, तुमच्याकडंच हाय ते पिढ्यान् पिढ्या!
पाटील : (मध्यस्थी करत) आसू द्या, आसू द्या. इतिहास काढू नका एकमेकांचा! (व्यंक्याची समजूत काढत) त्येचं बी म्हननं काय खोटं नाय. दगूड कसा हालवायचा ह्यावर त्याचं मत त्यांनं सांगितलं…तुम्हाला कुणाला दुसरी काय आयडिया सुचत आसंल तर सांगा!
(गावकरी आपापसात कुजबूज करायला लागतात)
हणम्या : आपून आसं करू दगडाला मधोमध सुरुंग लावून फोडू त्यो... बारीक बारीक तुकडे करू त्याचे, म्हजी उडाले हिकडं-तिकडं तरी फार काय लुसकान व्हणार नाय.
पाटील : पण तुकडे बारीक बारीकच होतील याची काय गॅरान्टी हाय? अन् स्फोटानं जमीन हादरून आणखी काय गडबड झाली तर? आधीच पावसानं दैना झालीय सगळी.
चोख्या : ते बी खरंच हाय म्हणा!
पांडू : इनाकारण फट् म्हणता ब्रह्महत्या व्हयाची!
हणम्या : आपन या दगडाचं भगदाड धरून खालच्या अंगानं एक भुयार का खणू नये रस्ता म्हणून?
व्यंक्या : च्याआयचं बेणं तुझ्या! उंदरांसाठी नाय माणसांसाठी रस्ता हवाय आपल्याला!
पाटील : असू द्या,असू द्या! त्याला जे वाटलं ते सांगितलं त्यानं! आणखी कुणाला काय सुचतंय का सांगा!
गणप्या : म्या काय म्हन्तो, आपून त्या दगडालाच हात जोडून इनंती केली तर?
हणम्या : दगडाला इनंती? त्याला कुठं ऐकता येतंय?
गणप्या : जो देव आपलं ऐकतो तो दगडाचाच असतो का न्हाय? मग हा दगड का नाय ऐकणार आपलं? (हात जोडत दगडाला उद्देशून) बाजूला व्हय की बाबा! का आमची वाट अडवलीस इनाकारण?
(सगळे त्याच्यावर भडकतात)
पांडू : चॅ आयचं बेणं तुझ्या…
बाज्या : तुला बरी मिळते रे ढोसलायला. कुठनं आणतोस एवढी रोज रोज?
हणम्या : घरातच भट्टी लावतुया न्हाय तर काय?
गणप्या : म्या काय माझ्यासाठीच पाडतोय का दारू?

पाटील : नाय म्हनलं तरी खोटं हाय का त्याचं म्हणणं? आपणसुदिक हातभार लावतोय की त्याच्या यवसायाला!
(सगळे हसत “व्हय,व्हय ते पण खरं हाय” असं म्हणत त्यांना दुजोरा देतात. गणप्या पुन्हा हात जोडून अंगाचं मुटकुळं करून बसतो)
पाटील : आसुद्या, आसुद्या. पांडूचं काय म्हणणं आहे ते पण ऐकून घेऊ आपण. बोल पांडू!
पांडू : मी कौल लावला होता भैरोबाला दुपारी.
पाटील : हे बाकी लय चांगलं केलंस तू!
चोख्या : काय झाला मग पुढं?
पांडू : गावावर संकट आलंय ते असं टळायचं नाय...
पाटील : म्हजी कसं म्हणतो?
पांडू : कोंबडं नाय तर बकरं कापावं लागंल...
सुशीला : हे काय भलतंच?
पांडू : कायतरी बळी द्यावाच लागंल असं दिसतंय...
सुशीला : बळी? डोकं ठिकाणावर हाय का तुझं?
नामदेव : काय मूर्खपणा चाललाय हा? जग कुठं चाललंय आणि आपण कुठं चाललोय!
पाटील : तुझं म्हणणं खर आहे नाम्या, पण प्रत्येकाचं ऐकून घ्यावं लागतं आम्हाला. लोकशाही हाय आपल्याकडं.
नामदेव : अहो पण एकविसाव्या शतकात बळी देण्याचा विचार येतोच कसा तुमच्या डोक्यात? अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा केलाय सरकारनं हे तरी लक्षात घ्या!
गुरव : मला जे भविष्य दिसलं ते मी तुमाला सांगितलं, बाकी तुमचं तुम्ही ठरवा! (काही क्षण शांतता)
व्यंक्या : (पाटलांना) मला वाटतं आपण दगड पडल्याची बातमी आधी आण्णासाहेबांच्या कानावर घालायला हवी. ते रितीला धरून व्हईल...
पाटील : लाख मोलाचं बोललास यंक्या. आजवर आपून परत्येक निर्णय त्येस्नी इचारूनच घेतला का नाय?
व्यंक्या : ते आमदार आपले! शिवाय पालकमंत्री! त्याना सगळी माहिती हवीच!
गणप्या : व्हय व्हय!
पांडू : अगदी बरोबर!
नामदेव : यात अण्णासाहेबांचा काय संबंध? आणि पत्ता तरी कुठाय त्यांचा? इलेक्शनसाठी मतं मागायला आले होते तेवढेच. नंतर काय तोंड दाखवलं नाय त्यांनी कधी! (स्फोटक शांतता)
पाटील : आन्नासाहेब तुमाला रोजरोज दिसायला काय पारावरचा मारूती वाटला व्हय रं? ग्रामविकास मंत्री म्हणून समद्या राज्याचा कारबार सांभाळावा लागतो त्येस्नी...आन् त्ये कुठंबी आसलं तरी आपल्या मतदार संघावर बारीक नजर आस्ती का न्हाय त्येंची?
व्यंक्या : हे आगदी खरं हाय तुमचं!
पाटील : आपल्या डोंगरवाडीचा विकास व्हावा म्हणून ‘रोप-वे’चा प्रकल्प आणला त्यांनी. आंबेवाडीपासनं महादेवाच्या देवळापतूर डामरी रस्ता व्हतूया. निधी मंजूर व्हवून आलाय. तेरड्याच्या माळावर लाईटचे पोलपण येऊन पडले. लोक मोठ्या संख्येनं येतील का न्हाय आता आपल्या गावाकडं?
व्यंक्या : अगदी बरोबर!
पाटील : मोफत वाय-फाय पण देणार आहेत अण्णासाहेब आपल्याला...आपण साथ नको द्याया त्यांना?
चोख्या : अगदी बरोबर!
नामदेव : पण आता कुठाहेत ते?
पाटील : लंडनला!
एक : लंडनला?
पाटील : ती बायपास का काय म्हनतात ती सर्जरी झाली का नाय त्यांच्यावर...
दोन : म्हजी हार्ट सर्जरी म्हणतात ते तेच का काय?
पाटील : बरोबर! मोठा हार्ट अटॅक येऊन गेला त्यांना मागच्या हप्त्यात. जीव वाचला नशिबानं...
तीन : अरं माझ्या देवा!

पाटील : एवढा आजारी मानूस, त्यो परत येइपरेंत आपून जर का थांबलो तं आसं काय लुसकान व्हनार हाय? थोडी तरी माणुसकी दाखवायला हावी का नको?
व्यंक्या : अगदी खरं हाय!
चार : त्येबी बरूबरच म्हना! पर परतणार कवा ते?
पाटील : बघू कधी जमतंय त्यांना ते!
व्यंक्या : पाटील म्हणतात त्याप्रमाणे आपुन अण्णासाहेब येइपर्यंत वाट बघायला हवी आपण!
अब्दुल : मगर मै कितनी देर तक इंतजार करू? (टमरेल हातात घेतल्याची ॲक्शन करून दाखवत) इसका क्या?
पाटील : (मैदानाकडे हात दाखवत) हिकडं वरच्या अंगाला जायचं समद्यांनी आता! सांगितलं का नाही काल?
व्यंक्या : (संतापत) आता बसतोस का खाली का हाणू जोड्यानं? चांगलं काय सुचत नाय का रे तुमा लोकांना?
अब्दुल : साला इधर हगने की भी चोरी!
व्यंक्या : फिर जा ना पाकिस्तान मे!
अब्दुल : देख व्यंक्या,बहुत सून लिया मैं…
व्यंक्या : चॅयचं बेणं तुझ्या! क्या करेगा रे?
पाटील : तुमची भांडणं थांबवा आधी आणि मी काय म्हणतो ते ऐका नीट!
सुशीला : ते बाकीचं राहू दे… शाळेचं काय ते सांगा आधी!
पाटील : थांबा की चार दिवस! काय फरक पडतोय त्यानं?
नाम्या : माझी पार्ट टाइम नोकरी आहे ती जाणार आता! कॉलेजपण बुडतंय!
पाटील : काय उपेग त्याचा? शिकून कुणाचं भलं झालंय?
नामदेव : गावचे कारभारीच जर असं म्हणायला लागले तर काय भलं होणार आहे कुणाचं? स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतोय आपण हेच कळत नाही तुम्हाला!
सुशीला : खरंच कठीण आहे अगदी!
नामदेव : पुढं जायचं तर शिकलं पाहिजे माणसानं! जगात काय चाललंय हे कळलं पाहिजे त्याला नीट!
मंजुळा : तुमची चर्चा जाऊदे चुलीत! माझ्या भाजीपाल्याचं आणि दुधाचं काय करायचं ते सांगा आधी!
पाटील : कळ काढ की चार दिस! नाहीतर वाटून टाक गावात, तेवढाच दुवा मिळंल लोकांचा.
मंजुळा: काय करावं माझ्या कर्मा आता?
बाज्या : तुमचं समद्यांचं व्हईल कसंतरी पर म्या काय करू? तिकडं ढोलकी वाजायला लागली की (झुलत) जीव कसा चाटमुट चाटमुट, चाटमुट चाटमुट…करतोय माझा!
गणप्या : गावाचं काय चाललंय आणि तुझं काय चाललंय!
चोख्या : इतका कोडगा कसा रे तू?
पांडू : कधी सुधारायचा नाही साला!
नामदेव : (आक्रमक) हे बघा, मी पुन्हा सांगतो की दगड हलवणं ही काही फार अवघड गोष्ट नाही. अण्णासाहेब येइपर्यंत आपण वाट बघत बसलो तर त्यामुळं आणखीनच हाल होतील आपले. आपण सर्वांनी मिळून, ताकद लावली तर अगदी सहजपणे ढकलून बाजूला करू शकतो तो!
पाटील : (धोरणीपणे) तू म्हणतोस तसं केलं आणि पडला खाली तो जांभूळझरीवर? मेली पाच-पन्नास माणसं तर?
पांडू : व्हय व्हय, काय करणार मग?
नामदेव : निदान थोडा बाजूला सरकवून फूट-दोन फुटाची जाण्या-येण्यापुरती वाट तरी करूया की!
पाटील : पुन्हा तेच? वाट पाडाया गेलो आपण अन् वरनं पुन्हा दरड कोसळली तर?
व्यंक्या : पाटील सांगतात त्येस्नी कायीच अक्कल न्हाय असं म्हणायचं हाय का तुला?
नामदेव : मी तसं म्हटलेलं नाही... मला फक्त इतकंच म्हणायचं आहे की साधा एक दगड हलवण्यासाठी आपल्याला कुणाच्याही सल्ल्याची,मदतीची गरज नाही.
व्यंक्या : गप बसतो का हाणू जोड्यानं आता?
नाम्या : (त्याची गचांडी धरत) एकदाच सांगतो तुला,मला शहाणपणा शिकवायचा नाय, आणि माझ्या अंगावर धावून यायचं नाय, कळलं?

पाटील : (त्याला शांत करत) असूदे,असूदे! पोर-आक्कल हाय त्याची. गावाचा कारभार कसा चालवायचा हे चार बुकं वाचून कळलं आसतं तं समदं जग बदलून गेलं नसतं?
गणप्या : माझ्या डोक्यात एक आयडिया हाय साहेब…
पाटील : हां बोल!
गणप्या : (खाली डोकावून पहात) हा इकडं खाली, जो हा मोठा दगड दिसतोय नव्हं का दुसरा?
पाटील : बरं मग?
गणप्या : त्याच्या अंगावर ढकलायचं याला!
पाटील : माझ्या लक्षात नाय आलं? काय म्हणतोस तू नेमकं?
गणप्या : एखादा दारुड्या रस्त्यानं जाताना पडत-धडपडत जातो, पर तेच दोन दारुडे जात असतील तर एकमेकाला सांभाळत, आधार देत जातात का न्हाय सरळ? तशे हे दोन दगड एकमेकाला धरून उभे राहतील जागच्या जागी!
(सगळे त्याच्यावर वैतागतात)
पांडू : (तिरकसपणे) व्वा!
हणम्या : म्युझियममध्ये ठेवायला पाहिजे तुझा मेंदू?.
व्यंक्या : आईन्स्टाईनसुद्धा झक मारतोय तुझ्या अकलेपुढं!
चोख्या : रोगापेक्षा इलाज भयंकर हाय तुझा!
हणम्या : घरातच भट्टी लावून ठेवलीय साल्यानं त्यामुळे नको नको त्या गोष्टी सुचत असतात त्याला...
पाटील : (सगळ्यांना समजावत) असू द्या असू द्या!
व्यंक्या : किती मोठं मन हाय साहेब तुमचं, सगळ्यांचं बारीक सारीक ऐकून घेता तुम्ही!
पाटील : ऐकावंच लागतं. चर्चा करूनच गावाचे अनेक प्रश्न सोडवले आजपतूर आमी. आता कुणाला काय सुचत नसंल तर हा प्रश्नबी सोडवतो आमी यवस्थित. आमच्या इज्जतीचा सवाल हाय तो आता!
व्यंक्या : चला, देव पावला म्हणायचं!
नामदेव : पाटीलसाहेब, हा प्रश्न कृती करण्याचा आहे. तो इज्जतीचा करून त्यात राजकारण आणण्याचा प्रयत्न करू नका तुम्ही!
सर्वजण : (एकदम) राजकारण?
पाटील : आमच्या प्रत्येक गोष्टीत राजकारण दिसतं तुमाला. यात कसलं आलंय राजकारण? आणि वाईट काय असतं राजकारणात मला सांगा! आपल्या भल्यासाठीच असतं ना ते? (सर्व शांत…हाक मारत)हणम्याsss
हणम्या : जी मालक!
पाटील : हे बघ तू असं करायचं?
हणम्या : काय?
पाटील : ह्या वरच्या वाटेने चढून खाली शहरात जायचं आणि मी सांगतो तिथं तिथं निरोप पोचवायचा!
हणम्या : बरं साहेब!
पाटील : लगीच निघ!
हणम्या : हा काय निघालो! आधी लगीन कोंढाण्याचं मग रायबाचं! (असं म्हणत तो पळत पळत वर निघतो. सारे जणू त्याला निरोप देत आहेत. गाणे सुरू होते.)
: झोपलेल्या माणसा रे उठ जागा हो अता
माणसाच्या जागराची ऐक ही न्यारी कथा…
क्षणभर अंधार.)

*

प्रवेश चवथा.

पुन्हा प्रकाश. स्थळ तेच.

*

सूत्रधार : मंडळी! गावात एक-दोघांकडे मोबाईल होते. पण लाईट नसल्याने ते नीट चार्ज होत नव्हते. बाहेर कुठेही संपर्क होत नव्हता पण दगड पडल्याची बातमी हणम्याने कशीबशी शहरात पोहोचली. सरकारी यंत्रणेंबरोबरच मीडियालासुद्धा जाग आली. 'डोंगरवाडीचा जगाशी संपर्क तुटला, गावकऱ्यांचे हाल, शासनाचे दुर्लक्ष…' अशा बातम्या यायला लागल्या! पालकमंत्री अण्णासाहेबांनी थेट
लंडनहून कलेक्टरला चौकशीचे आदेश दिले! त्याचा पहिला परिणाम म्हणून की काय वरच्या त्या अवघड वाटेने पोलिस इन्स्पेक्टर बाजीराव घोरपडे आणि हवालदार नागेश राठोड गावात येऊन पोहोचले.

(संगीत सुरू होते. घोरपडे आणि राठोड येतात. खूप खडतर आणि लांबच्या वाटेने चालत यावे लागल्यामुळे त्रासून गेलेले आहेत. गावकरी 'पोलिस आले, पोलिस आले' असे कुजबुजतात. हवालदार सॅकमधून पाण्याची बाटली काढतो, साहेबांना पाणी देतो. बाटली पुन्हा सॅकमध्ये ठेवून खिशातून गुटख्याचा पाऊच काढतो. त्याचा कोपरा फाडून साहेबांच्या तळहातावर गुटखा ठेवतो. साहेब गुटख्याचा बार भरतात. हवालदार उरलेला गुटखा आपल्या तोंडात रिकामा करतो आणि तो पाऊच दगडाच्या बाजूला हवेतल्या हवेत फेकून देतो. पाऊच दरीत खाली खाली जाताना तो गंमतीने वाकून वाकून पाहत आहे. गावकरी भितीने लांब उभे. घोरपडे आणि राठोड पुढे येऊन वेगवेगळ्या अँगलमधून दगड निरखून पाहू लागतात. घोरपडे खिशातून मोबाईल काढतो आणि दगडाचा फोटो घेण्याचा प्रयत्न करतो. पण त्याच्या मोबाईलची बॅटरी डाउन झालेली आहे.)
घोरपडे : (हवालदाराला) राठोड?
राठोड : येस सर!
घोरपडे : तुझा मोबाईल दे, बॅटरी डाऊन झालीय माझी!
राठोड : माझीपण बॅटरी डाउन हाय साहेब! मला काय अंदाज आला नाही नीट, एवढं लांब यावं लागेल याचा! पावर-बँक आणली असती बरोबर!
घोरपडे : (गावकऱ्यांना) हितं चार्जर हाय का कुणाकडं?
एक : आम्हा गरिबांकडं कुठला आलाय चार्जर?
दुसरा : एक दोन मोबाईल हायेती गावात पण लाईट जाती घडीघडी, तर चार्ज कसा होणार तो?
घोरपडे : चॅयला, कसलं गाव हे तुमचं!
एक : (धीर करून हात जोडून पुढे येत) साहेब, काएव करा पन हा दगूड हितनं हलवा लवकर!
घोरपडे : ('कसा सापडला' या शैलीत त्याच्याकडे पाहात पुढे येतो व त्याची मानगूट पकडीत) नाव काय तुझं?
चोख्या : चोख्या.
घोरपडे : बाप हाय का मेला?
चोख्या : चांगदेव.
घोरपडे : पूर्ण नाव सांगाय लाज वाटती व्हय रं?
चोख्या : चोख्या चांगदेव खराडे, उमर चाळीस वर्स. राहणार डोंगरवाडी…
घोरपडे : (खोचकपणे) काय रे, तू खराडे म्हणजे…
चोख्या : (त्याचा 'जातीवर जाण्या'चा हेतू लक्षात घेऊन एकदम उसळत) साहेब जात काढायचं कारण नाय! सगळ्या जाती-धर्माची लोकं गुण्यागोविंदाने राहतात इथं. उगा काडी टाकू नका तुमी त्यात!
घोरपडे : (थोडा नरमत) अरे पण तसं कुठं म्हणालो मी?
चोख्या : म्हणायला कशाला पायजे, दिसत व्हय ते?
घोरपडे : बरं बरं जास्त शहाणपणा करू नको. सांग, हा दगड कुणी टाकला इथं सांग?
चोख्या : टाकला म्हजी काय सायेब, आमटीत मीठ टाकण्यासारखी सोपी गोष्ट हाय का ती?
घोरपडे : विचारतो तेवढं सांगायचं, कुणी टाकला हा इथं?
चोख्या : माणूस कसा काय टाकू शकतो एवढा मोठा दगुड? काय लॉजिक हवं का नको तुमच्या बोलण्याला?
घोरपडे : तुम्ही गावातले लोक फार चॅप्टर असता! काहीही करू शकता तुम्ही!
चोख्या : पण का करू आमी असं? त्याला कारण नको?
घोरपडे : ते मला काय माहीत नाय. मी विचारतो तेवढंच सांगायचं, (गचांडी धरत) बोल, कुणी टाकला हा दगड इथं?

चोख्या : मला खरंच म्हायत नाय साहेब. कितींदा सांगू?
घोरपडे : (थोबाडत) बोल, तिच्यायला! बोलतोस का नाय?
चोख्या: आय शप्पत मला म्हायत नाय सायब!
घोरपडे : आयची शपथ घेतो काय रे भडव्या! बापपण आठवंल बघ आता तुला. (त्याला खाली ओढून त्याच्या पोटात ढोपर मारतो. तो विव्हळत खाली पडतो.)
चोख्या : मारू नगा साहेब,मी काय गुन्हा केलाय तुमचा?
घोरपडे : (आणखी मारत) बोल साल्या,बोल नाय तं तुज्या गां... (थू: ऽऽऽ करून बाजूला पिचकी टाकतो.)
गणप्या : (हात जोडत) सायेब त्यात त्याचा काय दोष नाय. हा दगूड डोंगरातनं सुटून खाली आलाय आपल्याआप!
घोरपडे : (चोख्याला सोडून 'कसा सापडला' या नजरेने पहात गणप्याकडे येतो. गचांडी धरून) नाव काय तुझं?
गणप्या : गणप्या!
घोरपडे : बापाचं?
गणप्या : रामज्या!
घोरपडे : आडनांव?
गणप्या : इंगवले!
घोरपडे : असा लाईनशीर बोल की!
गणप्या : (झुकत) मी एक सामान्य माणूस आहे साहेब!
घोरपडे : अरं वा! तुझ्याच शोधात होतो मी इतके दिवस! हिकडं ये असा, शेल्फी काढू आपली!
गणप्या : (टरकत) कशाला तरास देताय साहेब?
घोरपडे : (पुन्हा त्याची गचांडी धरत) त्या सामान्य माणसानं न्हेमी बाजूला एका कोपऱ्यात उभं ऱ्हायचं… मेनस्ट्रीममधी कधी येयाचं नाय, काय?
गणप्या : (हात जोडत) व्हय!
घोरपडे : मग व्हतोस बाजूला का हानू तुज्याबी गां... (थू: ऽऽऽ करून पिचकी टाकतो.)
राठोड : साहेब एक विचारू का?
घोरपडे : हो विचार की!
राठोड : त्या सामान्य माणसाला नेहमी कोपऱ्यात उभं का केलं जातं?
घोरपडे : (त्याच्या कानाला लागत) अरे तो फार डेंजरस असतो म्हणून! तो जर मेन स्ट्रिममधी आला तर उलथापालथ घडवून आणू शकतो सगळी! लक्षात ठेव! नवीन आहेस म्हणून सांगतोय तुला हे!
राठोड : थँक्यू सर!
सुशीला : (पुढे येत) तुम्ही नुसतेच टाइमपास करत बसणार आहात इथं का दगड हलवणार आहात?
घोरपडे : तू कोण?
सुशीला : मी सुशीला.
घोरपडे : आई-बाप, उद्योग-धंदा काही आहे का नाही?
सुशीला : शिक्षिका आहे मी खाली आंबेवाडीत. वाट बंद झाल्यानं शाळा बंद झालीय माझी. गावातल्या मुलांचंपण शिक्षण थांबलंय.
घोरपडे : राठोड!
राठोड : येस सर?
घोरपडे : स्टेटमेंट घे हिचं!
राठोड : (एकदम तत्परतेनं) सगळ्यांच्या समोर घेऊ का 'इन कॅमेरा' घेऊ?
घोरपडे :(खुशी लपवत) नवा नवा नोकरीला लागलायंस तर एवढी तयारी तुझी! पुढं काय करशील रे?
राठोड : (ओशाळेत) तसं नाही सर पण…
घोरपडे : ही गावातली माणसं फार चॅप्टर असतात हे लक्षात ठेव! सांभाळून राहायचं त्यांच्यापासनं!
राठोड : येस सर!
घोरपडे : (तिला) बोल,तुझा ह्या दगडाशी काय संबंध?
सुशीला : दगडाशी कसा संबंध असू शकतो माणसाचा?

घोरपडे : जास्त बोलायचं नाय! इथं कसा काय पडला हा तेवढं सांगायचं!
सुशीला : मला विचारून पडलाय का तो?
घोरपडे : उलट उत्तरं द्यायची नाहीत. नीट बोलायचं!
सुशीला : मग नीट प्रश्न विचारायचे! आम्ही पण शिकलेले आहोत हे लक्षात घ्या! शिक्षिका आहे मी!
घोरपडे : बाई म्हणून सोडणार नाय तुला… वेळ आली तर तर थर्ड डिग्री लावीन इथंच! पटापटा बोलायचं!
(सुशीला विचारात पडलेली.हळव्या संगीताचा एक तुकडा. प्रकाश हलकासा बदललेला.)
सुशीला : डांबरी रस्ता होतोय गावात येण्यासाठी… त्यासाठी वृक्षतोड चाललीय सगळीकडं. झाडांची मुळं माती धरून ठेवतात पण बरीच माती वाहून गेली यंदा पावसात.
घोरपडे : अरे वा अगदी पोपटासारखं बोलतीस की!
सुशीला : तुम्हीच म्हणता ना नीट बोलायचं म्हणून? जमीन खचत चाललीय याचा अर्थ येतोय का तुमच्या लक्षात?
घोरपडे : म्हजे विकासाची कामं करणारं सरकार मूर्ख आहे असंच म्हणायचंय ना तुला?
सुशीला : मी कुठं तसं म्हटलंय?
घोरपडे : एवढी अक्कल नाय का मला? गव्हर्मेंटच्या कामात आडवं यायचं हा तुमचा आवडता उद्योग!
सुशीला : आम्ही काय आडवे येतोय साहेब? आम्ही गरीब माणसं… एकुलती एक वाट आहे जाण्यायेण्यासाठी तेवढी नीट सुरू राहावी, एवढंच म्हणणं आमचं!
घोरपडे : एवढंच? म्हणजे?
सुशीला : माझ्याकडनं वदवून घ्यायचं आहे तुम्हाला सगळं.
घोरपडे : जास्त शहाणपणा करू नको, विद्यार्थी नाही मी तुझा! बोल पटापटा!
सुशीला : (पुन्हा स्वतः ठरवत) आमची गावात येणारी ही वाट आधी किती सुंदर होती! मोठमोठी झाड होती. पावसाळा सुरू झाला की जागोजागी झरे वहायचे. श्रावणात तेरडा फुलायचा, कितीतरी रानभाज्या उगवायच्या, तिळाची फुलं डोंगरावर पिवळा भंडारा उधळायची, फुलपाखरं नाचायची, पक्षी किलबिलाट करायचे, तेरड्याच्या माळावर मोर नाचायचे... तिथं लाईटचे खांब येऊन पडल्यामुळे मोर आले नाहीत यंदा… भकास होत चाललंय सगळं...
घोरपडे : म्हणजे गव्हर्नमेंट चुकीचं करतंय हेच ना?
सुशीला : तसं मी म्हणत नाही पण रस्ता करण्याची काय गरज होती विनाकारण? दरडी कोसळणार नाय तर काय होणार मग? झोप लागत नाही नीट! कसं जगावं आम्ही!
राठोड : (गोंधळून इन्स्पेक्टरकडे पाहत) साहेब?
घोरपडे : काय रे?
राठोड : इतका विचार करतीय ही की तुरुंगातच टाकली पाहिजे हिला!
घोरपडे : तू म्हणत होतास तेच बरोबर होतं...
राठोड : काय?
घोरपडे : (तिच्या दंडाला धरून तिला त्याच्याकडे ढकलत) जा, इन् कॅमेरा स्टेटमेंट घे हिचं!
नामदेव : (दुसरीकडून पुढे येऊन सुशीलाला आधार देत आक्रमकपणे) हे पहा साहेब, तुम्ही गावावरचं संकट दूर करायला आलाय, का आम्हाला छळायला आलाय इथं? बाईच्या अंगाला हात लावू नये एवढं साधं सौजन्य नाही तुम्हाला? आधीच वाट बंद झाल्यापासनं हाल होताहेत आमचे, त्यात भर कशाला घालताय तुम्ही?
घोरपडे : (जळजळीत नजरेनं पहात) आपण कोण?
नामदेव : मी कोणीही असेन, कायदा हातात घेणे हे तुमचं काम नाही. माणसाला दोषी किंवा निर्दोषी ठरवण्याचं काम कोर्टाचं असतं, पोलिसांचं नाही!
घोरपडे : मला कायदा शिकवतोस व्हय रे?
नामदेव : कायदा शिकवत नाही. फक्त विनंती करतोय की हा दगड बाजूला कसा करता येईल तेवढं बघा!
राठोड : हे बगा, आम्ही हितं आलोय ते दगडावर वॉच ठिवायला. दगड हलवणं हे पीडब्ल्यू.डी.चं काम, पोलिस डिपार्टमेंटचं नाय, समजलं?
('पाटील आले, पाटील आले' असा गलका. पाटील येतात.)
पाटील : (घोरपडेना) रामराम साहेब!

घोरपडे : रामराम! हणम्या आला होता खबर द्यायला…
पाटील : (हात जोडत) बरं झालं तुमी अर्जंटली आलात!
घोरपडे : कलेक्टरसाहेब येतायत, पुढे आलो आम्ही  बंदोबस्तासाठी!
पाटील : कलेक्टरसाहेब येताहेत?
घोरपडे : हो, आहेतच मागोमाग…
(थीम म्युझिक वाजू लागते."कलेक्टर येताहेत, कलेक्टर येताहेत" असं कुजबुजत सगळ्यांची पळापळ.)
सूत्रधार : आणि मंडळी, अखेर शिव्याशाप देत का होईना पण त्या वरच्या खडतर वाटेनं कलेक्टरसाहेबानी आपली पायधूळ डोंगरवाडीला झाडली…

(कलेक्टर एस. रामपाल, त्यांच्या मागोमाग तहसीलदार पोळ येतात. मागे खांद्यावर सरकारी दप्तर घेतलेला एक कोतवाल. गावकरी त्यांना अभिवादन करत आहेत. घोरपडे आणि राठोड आपली ओळख करून देत त्यांना सॅल्यूट करतात. रामपाल दगड न्याहाळू लागतात. गावकरी अदबीनं उभे. हातात हात घेतलेले चंद्या आणि पमी कुतूहलाने पहात एकीकडे उभे. )
रामपाल : (हाक मारत) तहसीलदार ऽऽऽ
पोळ : येस सर?
रामपाल : (फैलावर घेत) आधी कळवायला पाहिजे होतं तुम्ही हे मला!
पोळ : सॉरी सर... पण मला कळली नाही बातमी.
रामपाल : लक्ष कुठं असतं तुमचं? एवढा मोठा दगड पडला गावात, गावाचा संपर्क तुटला जगाशी, तरी माहीत नाही, करता काय तुम्ही? नुस्ता पगार आणि भत्ते पाहिजेत!
पोळ : सर...
रामपाल : अण्णासाहेबांनी लंडनवरनं फोन करून कळवलं मला आणि तुम्हाला इथं बसून काहीच पत्ता नाही?
पोळ : सॉरी सर. काळजी घेतो भविष्यात!
रामपाल : भविष्यात काळजी घेतो म्हणजे? दगड काय तुम्हाला सांगून कोसळणार आहेत का यापुढे?
(पोळ ओशाळून मान खाली घालतो)
एक : (हात जोडत) सायेब काएव करा पन हा दगूड हितनं हलवा. आमची फार गैरसोय व्हतीय.
सुशीला : मुलांचं शाळेचं नुकसान होतंय.
मंजुळा : औषधपाणी मिळत न्हाय. रतीब बंद झाल्यामुळं माजं दूद वाया जातंय. समदा भाजीपाला नासून जातुया साहेब, सरकारकडनं काय लुकसान भरपाई मिळाली तं बघा, उपकार व्हतील!
रामपाल : बघतो मी काय करता येईल ते!
मंजुळा : माझी पुष्पी तापानं फणफणलीय तिला दवाखान्यात नेऊ शकली नाय मी! कसं जगावं सांगा?
(पाटील रोखून तिच्याकडे पाहतात, ती पदर डोक्यावर घेऊन मान फिरवते)
रामपाल : तहसीलदार...
पोळ : येस सर!
रामपाल : ह्या सर्वांचे जबाब घ्या.
पोळ : येस सर!
रामपाल : पंचनामे करा.
पोळ : येस सर!
रामपाल : दगडाचं मोजमाप घ्या!आजूबाजूची पाहणी करून नुकसानीचा अंदाज घ्या…
पोळ : हो सर!
रामपाल : दगड हलवण्यासाठी स्थानिक पातळीवर काय उपाय करता येईल याचा एक प्रस्ताव तयार करून पाठवा माझ्याकडं लगेच!
पोळ : हो सर!
रामपाल : (पाटलांना) तुम्ही मदत करायची यांना!
पाटील : हो सर!

रामपाल : (तहसीलदारांना) बाकीची सगळी कामं बाजूला ठेवा. धिस इज व्हेरी अर्जंट!
पोळ : हो सर!
रामपाल : (गावकऱ्यांना) हे पहा, मी हे प्रकरण कमिशनर साहेबांच्या कानी घालतो. अण्णासाहेबांशी बोलतील ते. तिकडनं उत्तर आल्यावर बघू काय करायचं ते!
नामदेव : पण साहेब तोपर्यंत आम्ही काय करायचं? तुम्ही कलेक्टर आहात, तुम्हाला पॉवर्स आहेत. एवढ्या साध्या गोष्टीसाठी आणखी कुणाच्या परवानगीची गरज काय?
रामपाल : तुमच्या भावना मी समजू शकतो. पण प्रकरण रिस्की आहे. दगड खाली गेला आणि आणखी माणसं मेली तर त्याला कोण जबाबदार? कोणाच्या जीवाशी खेळू शकत नाही मी. वरून आदेश घ्यावे लागतील. वरून मान्यता मिळेपर्यंत दगड हलवता येणार नाही.
नामदेव : याला काय अर्थ आहे साहेब? आम्ही कुठवर थांबायचं मग?
रामपाल : माझे हात कायद्याने बांधलेले आहेत…
नामदेव : असला कसला कायदा हा तुमचा?
रामपाल : तुम्हाला समजणार नाही! वेळ आली तर हे प्रकरण गव्हर्मेंटला रेफर करावं लागेल. (सूचक हाक मारत) तहसीलदार?
पोळ : (कलेक्टरच्या मनातील उमजून पट्कन) जेवणाचा बंदोबस्त वर देवळापाशी केलाय सर!
रामपाल : गुड! चला…
(निघतात. अब्दुल त्यांना अडवतो, हात जोडत)
अब्दुल : साब मेरी एक रिक्वेस्ट थी…
रामपाल : कसली रिक्वेस्ट?
अब्दुल : यंहा पत्थर गिरने के बाद मेरा अलग ही प्रॉब्लेम हो रहा है.
रामपाल : बोल की!
अब्दुल : म्हजी आसं बगा, आझादी के बाद–
रामपाल : जे काय ते थोडक्यात सांगा, माझ्याकडे वेळ नाही तुमचं भाषण ऐकायला! इतक्या लांबून तंगड्या तोडत आलोय इथे. आणि कलेक्टर म्हणजे काही सुपरमॅन नसतो हे पण लक्षात घ्या!
अब्दुल : सरकार को इतना ही बताना की ह्यां गावमे खुले मे बैठके हगनेवालोंको एक-दो संडास बांध के दे देना!
रामपाल : (चक्रावून) जिल्हा परिषदेचा विषय आहे तो. सी.ओं.शी बोला तुम्ही. डीपीडीसीमधून निधी उपलब्ध करून दिलाय आम्ही त्यांना, काय झालं त्यांचं पुढं?
एक : ते ह्या पाटलांनाच विचारा ना तुम्ही!
नामदेव : (स्वतःच पुढे होत) पैसे आले होते साहेब पण ते गावात पोहोचेपर्यंत फक्त दोन विटा विकत घेता येतील एवढीच रक्कम शिल्लक राहिली!
नामदेव : संडास नाय तर नाय निदान दहा-वीस विटा तरी पाठवून द्या म्हणावं!
रामपाल : हे जरा जास्तच होतंय असं वाटत नाही तुम्हाला? कलेक्टरशी बोलताय तुम्ही!
नामदेव : या प्रश्नाचं गांभीर्य कळावं तुम्हाला म्हणूनच या भाषेत बोलतोय साहेब!
अब्दुल : असलमे सच बोलने का तो, खाने का रोग लगा है हर एक को ! कितना भी खा लो, पेट नही भरता किसीका!
कलेक्टर : (चिडत) आप जिम्मेदार नहीं इस सिच्युएशन को? विकासाच्या एवढ्या योजना आणतो आम्ही पण तुम्ही वाट लावता सगळी!
सुशीला : तुम्ही वरनं योजना लादता साहेब… पिढ्या न् पिढ्या राहतोय आम्ही इथं, आम्हाला रोपवेची काय गरज होती?
नामदेव : नाय तर काय?
सुशीला : तेरड्याच्या माळावर मोर यायचे, आनंदाने नाचायचे… यंदा आलेच नाहीत ते!
रामपाल : म्हणजे गव्हर्मेंटनं मोर पाठवावे तुमच्याकडे असं म्हणायचंय का तुम्हाला?

सुशीला : तसं नाही. आम्हाला काय हवं, काय नको ते नीट लक्षात घ्या एवढंच म्हणणं आहे आमचं… हाताला काम आणि पोटाला भाकरी मिळाली की भागतं आमचं सगळं… रामपाल : (तिखटपणे) कोणत्या पक्षाचं काम करता तुम्ही?
सुशीला : पक्षबिक्ष आम्हाला काही माहीत नाही. आमचा पक्ष शांततेचा, माणुसकीचा, दुसऱ्याला मदत करण्याचा! पाना-फुलांच्या, पशुपक्ष्यांच्या संगतीत आनंदानं राहण्याचा!
रामपाल : (जणू तो विचार चिरडून टाकत) तुमच्या कविता ऐकण्यात इंटरेस्ट नाही मला! तहसीलदार?
पोळ : येस सर?
रामपाल : चला!
पोळ : चला सर!
रामपाल : (जाता जाता क्षणभर दगडाजवळ थांबून खालील परिसर न्याहाळू लागतात. बदललेला प्रकाश. संगीत. स्वतःशी) व्हॉट अ युनिक स्पॉट! आय ॲम शुअर वन डे इट विल बिकम अ ट्रेकर्स पॅराडाईज!
पोळ : काय म्हणालात?
रामपाल : तुम्हाला कळणार नाही ते…चला!
(कलेक्टर, तहसीलदार, इन्स्पेक्टर, हवालदार निघून गेले आहेत. गावकरी आहेत तेथेच मूकपणे उभे. संगीत...)

सूत्रधार : तर मंडळी! कोणी आपल्या अहंकारासाठी, कोणी राजकीय स्वार्थासाठी, कोणी चिरीमिरीसाठी, तर कोणी आपले जन्मजात वर्चस्व राखण्याच्या भ्रमापोटी दगडाकडे एक साधन म्हणून पहात होते. गावातल्या सामान्य माणसाला आपण वेठीस धरत आहोत, तेथील सुंदर सहजीवन नष्ट करत आहोत, त्या माणसाचा निसर्गाशी असणारा संबंध तोडून टाकत आहोत हे कुणाच्याच लक्षात येत नव्हतं. नामदेवनं मात्र आपले प्रयत्न सोडले नव्हते. त्याला माहीत होतं की ही माणसं आंधळी, बहिरी, मुकी नाहीत. त्यांना योग्य मार्ग दाखवला पाहिजे. त्या दिशेने जातील ती! आपलं म्हणणं गावकऱ्यांना पटवून देण्याचा त्याचा प्रयत्न सुरू होता.
नामदेव : (पुढे येतो.त्याचा आता उद्रेक झालेला आहे. तो संतापाने थरथरत निर्वाणीच्या सुरात बोलू लागतो) गावकऱ्यांनो, हा दगड बाजूला करणं ही आपली या क्षणीची खरी गरज आहे आणि त्यासाठी अगदी सोपा असा एकच उपाय आहे… आपण सर्वांनी मिळून ताकद लावून तो ढकलून टाकणं! चला, या तुम्ही माझ्यासोबत, चला या! (सर्वांकडे अपेक्षेने पहातो पण ते निर्विकार) अरे असे गप्प काय बसलात? माझं ऐका, माझ्या सोबत या! (अपेक्षेने पहातो पण ते तसेच निर्विकार.) ऐकताय ना? ऐकू येतंय ना तुम्हाला? काहीच का बोलत नाही तुम्ही? तुमची, माझी, आपल्या सर्वांची अतिशय गंभीर अडचण सोडवण्यासाठी एकत्र का येत नाही तुम्ही? या सखुबाईंचा नवरा देशासाठी शहीद झाला दहशतवाद्यांशी लढता लढता याची तरी लाज बाळगा जरा! (सर्व तसेच निर्विकार) ठीक! तुमची मर्जी, पण मी मात्र आता थांबणार नाही. कुणाचाही भुलथापांना बळी पडणार नाही मी! एकट्यानं करीन प्रयत्न हा दगड हलवण्याचा… (इरेस पडून दगडाच्या एका कोपऱ्यात हात लावून ढकलण्याचा प्रयत्न करतो. एका ठिकाणाहून त्याचा हात सटकतो त्यामुळे तो ती जागा बदलतो. पुन्हा एक-दोन जागी चाचपून पाहतो. मध्येच त्याला एक मजबूत जागा सापडते. तिथे सर्व शक्ती लावून तो दगड ढकलू लागतो, भ्रमिष्टासारखा) जोर लगा के ऽऽऽ है य्या.. जोर लगाके है य्या... और जोरसे, है य्या... दम लगा के है य्या... और जोरसे... है य्या... दम लगा के है य्या... और थोडासा है... याऽऽऽ …(दगड जराही हलत नाही, तो क्षणभर विचार करतो) या भगदाडात उतरून प्रयत्न करूया, तेथून ढकलायला आणखी जोर लावता येईल! बघुया तर खरं प्रयत्न करून! (जेथे दगड टेकलेला आहे त्या छोट्याशा भगदडात उतरतो आणि तेथून दगड ढकलण्याचा प्रयत्न करू लागतो. पुन्हा "जोर लगाके है य्या" असं स्वतःशीच म्हणू लागतो. निकराने प्रयत्न करता करता भगदाडातून खालची माती आणि मातीबरोबर तोही घसरू लागतो) अरे, अरे...आई गंऽऽऽ वाचवा, धरा… हात द्या मला मला, पकडा कुणीतरी! आई गं, आई…मदत करा कुणीतरी… (कोणीच पुढे येत नाही तो आर्जव करत आहे पण काहीच उपयोग होत नाही) माती खचत असल्यामुळे खाली खाली सरकत चाललोय मी…(वर येण्याचा प्रयत्न करत) हात द्या मला कुणीतरी. थोडासा आधार मिळाला तरी मी बाहेर पडू शकतो... ऐकताय ना? ऐकू येतंय ना तुम्हाला? (मदतीसाठी हात पुढे करतो पण कोणीच पुढे येत नाही.) अरे तुम्ही सर्वजण असे मुक्या मेंढरासारखे गप्प का? तुमचे सर्वांचे चेहरे सरकारी फायलींसारखे निर्जीव कसे झाले रे? उठा! मदतीला या माझ्या! (माती सरकल्याने तो आणखी खाली जात आहे, एका ठिकाणी आधार पकडत) ओ !अरे बापरे! मदत करा…धावा… (हळूहळू तो दगडाच्या खाली सटकत चालला

आहे… शेवटी त्याचं फक्त मनगट आणि हाताचा पंजा वर राहतो… तोही आत गडप होत चालला आहे. शेवटी पंजावर प्रकाश एकवटतो. तो हलत आहे. बाकी स्टेज अंधारात.हलता हलता तो पंजाही खाली नाहीसा होतो… हळूहळू पूर्ण अंधार… अंधारातून करूण सुरात गाणे ऐकू येत आहे…

: नेमका हा प्रवास आहे कोण्या दिशेने चालला,
निरर्थकाचा खेळ की हा सांगा असे अंधारलेला?
नको लोभ तो, नको तंत्र ते, बांधी जे भिंती वृथा
माणसाच्या जागराची ऐक ही न्यारी कथा...

(काळजी वाढवणारे संगीत. हळूहळू पडदा.)

मध्यंतर

(या नाटकाची पूर्ण संहिता वाचण्यासाठी वर दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा!)

***